**महामार्ग पोलीस दल**

**महामार्ग वाहतूक पोलिस, महाराष्ट्र राज्य हे ठाणे, रायगड, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या पाच परिक्षेत्रामध्ये विभागले असून त्या अंतर्गत ६३ पोलिस मदत केंद्र (TAPs) व १३ सहाय्यक पोलिस मदत केंद्र (ATAPs) कार्यरत आहेतमहामार्ग पोलीस दलाचे कार्यक्षेत्र :-**

**महामार्ग पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्यातील ९८ राष्ट्रीय महामार्ग (१७,७५७ कि.मी.), ३८२ राज्य महामार्ग (३५,७५४.६८ कि.मी.) आणि मुंबई पुणे द्रुतगती मार्ग (९४.५ कि.मी.) आहेत.**

**महामार्ग पोलीस दलाचे उद्दिष्टे :-**

१) राज्यातील रस्ते व प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी सर्वकष प्रयत्न करणे
२) राष्ट्रीय व राज्य महामार्गावर अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करणे
३) अपघाताची सूचना संबंधीत पोलीस ठाणेस देणे
४) अपघात करून पळून गेलेल्या वाहनांचा शोध घेणे.
५) वाहतुकीची कोंडी दूर करणे
६) महामार्गावर अडकून पडलेल्या वाहनांच्या चालकांना मदत करणे
७) नादुरुस्त/बंद वाहनांना महामार्गावरुन बाजूला करून वाहतुक सुरळीत करणे
८) महामार्गावरुन वाहनाने प्रवास करणाऱ्या नागरीकांना दवाखाने, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे व विश्रामगृहाबाबत माहिती देणे.
९) महामार्गावर वाहतूक सुरळीत राहिल याची दक्षता घेणे.
१०) महामार्गावरील चोरी, जबरी चोरी व दरोडया सारख्या गुन्हयाना प्रतिबंध करणे.
११) महामार्गावर मोटार वाहन अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर प्रचलित अधिनियमान्वये कारवाई करणे.
**( महामार्ग सुरक्षा पथकास शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर क्र. ०८०७/४०९/ परि-२, गृह विभाग, मुंबई, दिनांक ०४/०८/२००९ नुसार मोटार वाहन कायद्या अंतर्गत कलम १७७, १८०, १८१, १८३ (१) (२), १८४, १८९, १९२ (१), १९६ अन्वये कारवाई करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.)**
१२) मा. सर्वोच्च न्यायालय समितीने महामार्गावरील अपघात कमी करण्याबाबत दिलेल्या निर्देशांची पुर्तता करणे.
(मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार देशातील रस्ते अपघाताची संख्या कमी करण्यासाठी रस्ते सुरक्षा ममिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश असतात. मदर समितीने रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युंमध्ये दरवर्षी १० टक्के घट करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याकरीता सदर समितीकडून रस्ते अपघात कमी करण्यासाठी सर्व राज्यांना विविध उपाययोजना करण्याचे निर्देश दिले जातात आणि केलेल्या उपाययोजनांबाबत सदर समितीकडून तिमाही आढावा घेण्यात येतो.)